


श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

श्रीमती शां. कां. गांधी कला, अमोलक विज्ञान व प. हि. गांधी वाणिज्य महाविद्यालय कडा

ता. आष्टी जिल्हा बीड ४१४२०२

भूगोल विभाग

प्रा. उध्दव एकनाथ चव्हाण
( विद्यावाचस्तपती )


# नैसर्गिक आपत्ती भूगोल

खालील रिकाम्या जागा भरा.

१)आंतरराष्ट्रीय स्तरावर नैसर्गिक समस्यांविषयी पहिली आगतिक परिषद १९७२ मध्ये स्वीडनमधील……… या शहरात संपन्न झाली.
उत्तर: आंतरराष्ट्रीय स्तरावर नैसर्गिक समस्यांविषयी पहिली जागतिक परिषद १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम या शहरात संपन्न झाली.

२) सर्वसाधारणपणे…….कडे साधनसंपत्तीचा मूळ स्रोत किंवा निर्माता म्हणून पाहिले जाते.
उत्तर: सर्वसाधारणपणे निसर्गाकडे साधनसंपत्तीचा मूळ स्रोत किंवा निर्माता म्हणून पाहिले जाते.

३) पृथ्वीवरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या मानवी जीवनावर पडलेल्या प्रभावाचा शास्त्रीय व संकलित अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे……. चा भूगोल होय.
उत्तर: पृथ्वीवरील नैसर्गिक व सांस्कृतिक घटकांच्या मानवी जीवनावर पडलेल्या प्रभावाचा शास्त्रीय व संकलित अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नैसर्गिक आपत्तीचा भूगोल होय.

४) नैसर्गिक आपत्तीच्या भूगोलाचे स्वरूप ……..शाखीय आहे.
उत्तर: नैसर्गिक आपत्तीच्या भूगोलाचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आहे.

५) नैसर्गिक आपत्तीचा भूगोल आणि ........भूगोल या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
उत्तर: नैसर्गिक आपत्तीचा भूगोल आणि प्राकृतिक भूगोल या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

६) नैसर्गिक, जैविक व वातावरणीय आपत्ती या पर्यावरणसंबंधी असल्याने त्यांना ........आपत्ती असेही म्हणतात.
उत्तर नैसर्गिक जैविक व वातावरणीय आपत्ती या पर्यावरणसंबंधी असल्याने त्यांना पर्यावरणीय आपत्ती असेही म्हणतात.
७) जलावरण, मृदावरण, वातावरण व जीवावरणात ........ने सर्वात जास्त प्रमाणात बदल घडवून आणले.
उत्तर: जलावरण, मृदावरण, वातावरण व जीवावरणात मानवाने सर्वात जास्त प्रमाणात बदल घडवून आणले.

८) .........यांच्या मतानुसार 'भूकवचाला हादरे बसणे म्हणजे भूकंप होय.'
उत्तर: पी. लेक यांच्या मतानुसार 'भूकवचाला हादरे बसणे म्हणजे भूकंप होय.'

९) भूगर्भात निर्माण होणाऱ्या........ हालचालीमुळे भूकवच कंप पावत असते..
उत्तर: भूगर्भात निर्माण होणाऱ्या अंतर्गत हालचालीमुळे भूकवच कंप पावत असते.

१०) जगात दरवर्षी कमी जास्त तीव्रतेचे सुमारे.... लक्ष भूकंप होतात. त्यापैकी १लाख जानवतात व १ हजार भूकंपनी हानी होते.
उत्तर: जगात दरवर्षी कमी जास्त तीव्रतेचे सुमारे पाच होतात त्यापैकी जाणवतात हजार भूकंपांनी हानी होते.

११) अंतर्गत हालचालीमुळे आतील अतिरिक्त ऊर्जा बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधत असते व याच दरम्यान भूपृष्ठावरील एखादया कमकुवत भूकवचात कंपने निर्माण होतात. त्यास........म्हणतात.
उत्तर: अंतर्गत हालचालीमुळे आतील अतिरिक्त ऊर्जा बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधत असते व याच दरम्यान भूपृष्ठावरील एखादया कमकुवत भूकवचात कंपने निर्माण होतात. त्यास भूकंप म्हणतात.

१२) ज्वालामुखी उद्रेक हे एक .......चे प्रमुख कारण आहे.
उत्तर: ज्वालामुखी उद्रेक हे एक भूकंपाचे प्रमुख कारण आहे.

१३) ३० सप्टेंबर १९९३ ला किल्लारी (जि. लातूर) येथील भूकंप हा ........हालचालीमुळे झाला होता.

उत्तर : ३० सप्टेंबर १९९३ ला किल्लारी (जि. लातूर) येथील भूकंप हा भूसांरचनिक हालचालीमुळे झाला होता.

१४) .......प्रकारचे भूकंप क्वचित होतात.
उत्तर:  पातालिक प्रकारचे भूकंप क्वचित होतात.

१५)  भूपट्ट सरकण्यामुळे ........ची निर्मिती होते.
उत्तर : भूपट्ट सरकण्यामुळे खचदरीची निर्मिती होते.

१६) दोन भूपट्ट परस्परापासून दूर सरकले जातात, त्यांना म्हणतात.
उत्तर: दोन भूपट्ट परस्परापासून दूर सरकले जातात, त्यांना अपसारी भूपट्ट म्हणतात.

१७) पूर्व आफ्रिकेतील पेट खचदरी ही..... सरकल्यामुळे निर्माण झालेली दरी आहे.
उत्तर: पूर्व आफ्रिकेतील ग्रेट खचदरी ही भूपट्ट सरकल्यामुळे निर्माण झालेली दरी आहे.

१८) भूपट्ट दुमडल्यामुळे अतिशय प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होते व ........ची निर्मिती होते.
उत्तर: भूपट्ट दुमडल्यामुळे अतिशय प्रचंड प्रमाणात उष्णता निर्माण होते व शिलारसाची निर्मिती होते.

१९)  पृथ्वीच्या......... मुळे महासागरी व वातावरणीय प्रवाह निर्माण होतात.
उत्तर : पृथ्वीच्या परिवलनामुळे महासागरी व वातावरणीय प्रवाह निर्माण होतात.

२०)  पर्वताच्या निर्मितीसंबंधी.................. ने आपला औष्णिक आकुंचनाचा सिद्धांत मांडला.
उत्तर: पर्वताच्या निर्मितीसंबंधी जेफरीने ने आपला औष्णिक आकुंचनाचा सिद्धांत मांडला.

२३) भारतीय दिवपकल्प उत्तरेकडील पर्वत प्रदेश हे भिन्न गुणधमांच्या खडकापासून बनलेले आहेत  तो भाग...... क्षेत्र म्हणून ओळखला जातो.
उत्तर: भारतीय दिवपकल्प व उत्तरेकडील पर्वत प्रदेश हे  भिन्न गुणधर्माच्या खडकापासून बनलेले आहेत. यांच्या सीमा ज्या भागात मिळतात तो भाग भारतीय भूकंप प्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो.

२४) सातारा जिल्ह्यातील कोयना परिसरात... रोजी भूकंप झाला.
उत्तर : सातारा जिल्ह्यातील कोयना परिसरात ११ डिसेंबर १९६७ रोजी भूकंप झाला.

२५) अतिखोल भूकंप .........कि.मी. खोलीपर्यंत निर्माण होतात.
उत्तर : अतिखोल भूकंप २५० ते ७०० कि.मी. खोलीपर्यंत निर्माण होतात.

२६) भूकंप तरंग भूकंपनाभीपासून निघाल्यावर त्याच्या सरळ वर आलेल्या भूपृष्ठावरील स्थानाला........ म्हणतात.
उत्तर: भूकंप तरंग भूकंपनाभीपासून निघाल्यावर त्याच्या सरळ वर आलेल्या भूपृष्ठावरील स्थानाला अपिकेंद्र म्हणतात.

२७) भूकंप निर्मिती झाल्यावर सर्वात प्रथम ..............तरंगाची निर्मिती होते.
उत्तर: भूकंप निर्मिती झाल्यावर सर्वात प्रथम प्राथमिक तरंगाची निर्मिती होते.

२८) प्राथमिक तरंगापेक्षा ................तरंगाचा वेग कमी असतो.
उत्तर: प्राथमिक तरंगापेक्षा व्दितीयक तरंगाचा वेग कमी असतो.

२९) भूकंपाचे धक्के पृष्ठभागाला.... दिशेने असतील तर फारसे नुकसान होत नाही.
उत्तर: भूकंपाचे धक्के पृष्ठभागाला समांतर दिशेने असतील तर फारसे नुकसान होत नाही.

३०) वर-खाली व क्षितिजसमांतर दिशेने प्रवास करणाऱ्या भूकंप तरंगाचा शोध ..............यांनी लावला.
उत्तर: वर-खाली व क्षितिजसमांतर दिशेने प्रवास करणाऱ्या भूकंप तरंगाचा शोध रॅले यांनी लावला.

३१) भूकवचातील धन, द्रव व वायुरूप पदार्थ भूकवचाकडे किंवा भूपृष्ठावर ढकलले जातात या सर्व प्रक्रियांना ...........प्रक्रिया म्हणतात.
उत्तर: भूकवचातील घन, द्रव व वायुरूप पदार्थ भूकवचाकडे किंवा भूपृष्ठावर ढकलले जातात. या सर्व प्रक्रियांना ज्वालामुखीय प्रक्रिया म्हणतात.

३२) पृथ्वीच्या पृष्ठभागावरून जसजसे अंतरंगात खोल-खोल जावे तसतसे ....... वाढत जाते.
उत्तर: पृथ्वीच्या पृष्ठभागावरून जसजसे अंतरंगात खोल खोल जावे तसतसे तापमान वाढत जाते.

३३) ज्वालामुखीच्या उद्रेकातून सर्वप्रथम .......पदार्थ बाहेर पडतात.
उत्तर: ज्वालामुखीच्या उद्रेकातून सर्वप्रथम वायुरूप पदार्थ बाहेर पडतात.

३४) लाव्हारसामध्ये असलेल्या........... च्या प्रमाणानुसार लाव्हारसाचे दोन प्रकार पडतात.

उत्तर : लाव्हारसामध्ये असलेल्या सिलिकाच्या प्रमाणानुसार लाव्हारसाचे दोन प्रकार पडतात.

३५) ..........प्रकारच्या ज्वालामुखीचे उद्‌देक स्फोटक नसतात.
उत्तर: हवाईयन प्रकारच्या ज्वालामुखीचे उद्रेक स्फोटक नसतात.

३६) इटालीतील एटना आणि लिपारी बेटावरील स्ट्रांबोली ही ----- ज्वालामुखीची उदाहरणे आहेत.
उत्तर: इटालीतील एटना आणि लिपारी बेटावरील स्ट्रांबोली ही जागृत ज्वालामुखीची उदाहरणे आहेत.

३७) भूअंतर्गत खडकातील घुमटाकार पोकळीत शिलारस साचून ...........तयार होतात.
उत्तर: भूअंतर्गत खडकातील घुमटाकार पोकळीत शिलारस साचून लॅकोलिथ तयार होतात.

३८) खडकातील वळ्यांच्या वळणावर व खाली शिलारसापासून घुमटाकार खडक तयार होतात त्याला........ म्हणतात.
उत्तर: खडकातील वळयांच्या वळणावर व खाली शिलारसापासून घुमटाकार खडक तयार होतात त्याला फॅकोलिथ म्हणतात.

३९) लंबनवन खोलगट आकाराच्या भागात शिलारस सातून खडक तयार होतो त्यास............ म्हणतात.
उत्तर: लंबनवन खोलगट आकाराच्या भागात शिलारस साचून खडक तयार होतो त्यास लॅपोलिथ म्हणतात.

४०) वलीकरणाने तयार झालेल्या पर्वतात शिलारसामुळे तयार झालेल्या विस्तृत आकारमानाच्या घुमटाकार खडकांना..... म्हणतात.
उत्तर: वलीकरणाने तयार झालेल्या पर्वतात शिलारसामुळे तयार झालेल्या विस्तृत आकारमानाच्या घुमटाकार खडकांना बॅथोलिथ म्हणतात.

४१) ज्वालामुखीय उद्रेकामुळे भूगर्भातील तप्त लाव्हारस, वायू व इतर पदार्थ भूपृष्ठावर येऊन पसरतात. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची.....तयार होतात.
उत्तर: ज्वालामुखीय उद्रेकामुळे भूगर्भातील तप्त लाव्हारस, वायू व इतर पदार्थ भूपृष्ठावर येऊन पसरतात. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारची भूरूपे तयार होतात.

४२) आयर्लंडमध्ये ज्वालामुखी निर्मित उष्ण पाण्याच्या फवाऱ्यांना म्हणतात.
उत्तर: आयलंडमध्ये ज्वालामुखी निर्मित उष्ण पाण्याच्या फवाऱ्यांना गेसर्स म्हणतात.

४३) जेव्हा ज्यालामुखीचा उद्रेक थांबलेला असतो, तेव्हा काही ज्खावालामुखीतून पाण्याची वाफ व वायूचे लोट बाहेर पडतात त्याला .......म्हणतात.
उत्तर: जेव्हा ज्यालामुखीचा उद्रेक थांबलेला असतो, तेव्हा काही ज्खावालामुखीतून पाण्याची वाफ व वायूचे लोट बाहेर पडतात त्याला फ्यूमरोलस म्हणतात.

४४) पृथ्वीच्या .........पृष्ठभागाच्या टक्के पृष्ठभाग पाण्याने व्यापला आहे.
उत्तर: पृष्ठभागाच्या २/३ टक्के पृष्ठभाग पाण्याने व्यापला आहे.

४५) पृथ्वीवर पाण्याचा एकूण साठा....... कोटी घन किलोमीटर आहे.
उत्तर: पृथ्वीवर पाण्याचा एकूण साठा १३६ कोटी घन किलोमीटर आहे.

४६) सध्या जगातील एकूण पाणी वापरापैकी टक्के पाणी उद्योगासाठी वापरले जाते.
उत्तर: सध्या जगातील एकूण पाणी वापरापैकी २३ टक्के पाणी उदयोगधंद्यासाठी वापरले जाते.

४७) सध्या जगातील पाण्याच्या एकूण वापरापैकी सुमारे ............टक्के पाणी घरगुती कारणासाठी वापरले जाते.
उत्तर: सध्या जगातील पाण्याच्या एकूण वापरापैकी सुमारे ७ टक्के पाणी घरगुती कारणासाठी वापरले जाते.

४८) पूर व अवर्षण या दोन्ही आपत्ती आहेत.
उत्तर: पूर व अवर्षण या दोन्ही पर्यावरणीय आपत्ती आहेत.

४९) १९६८ मध्ये नदीला आलेल्या पुरामुळे भूस्खलन, भूमिपात........ या क्रिया घडून आल्या.
उत्तर: १९६८ मध्ये तिस्ता नदीला आलेल्या पुरामुळे भूस्खलन, भूमिपात या क्रिया घडून आल्या.

५०) सप्टेंबर २०१४ मध्ये ..........राज्यात आलेल्या पुरामुळे जीवित व वित्तहानी झाली.
उत्तर: सप्टेंबर २०१४ मध्ये जम्मू काश्मीर राज्यात आलेल्या पुरामुळे जीवित व वित्तहानी झाली.

५१) भारतातील नदयांना येणारे पूर प्रामुख्याने त्यांची पात्रे................ होत असल्याने येतात.
उत्तर: भारतातील नदयांना येणारे पूर प्रामुख्याने त्यांची पात्रे उथळ होत असल्याने येतात.

५२) नागमोडी वळणाच्या नदयांना पुराचा धोका असल्याने नदयांची पात्रे ..............करणे हा एक प्रभावी उपाय आहे.

उत्तर: नागमोडी वळणाच्या नद्यांना पुराचा धोका असल्याने नदयांची पात्रे सरळ करणे हा एक प्रभावी उपाय आहे.

५३) उत्तर अमेरिकेतील संयुक्त संस्थानच्या मिसीसीपी, टेनेसी, मिसुरी, लरिन्स या नद्यांच्या खोऱ्यात..... मुळे भयंकर वृष्टी होऊन नदयांना पूर येतात.

उत्तर: उत्तर अमेरिकेतील संयुक्त संस्थानच्या मिसीसीपी, टेनेसी, मिसुरी, लॉरेन्स या नद्यांच्या खोऱ्यात आवर्तामुळे भयंकर वृष्टी होऊन नदयांना पूर येतात.

५४) ................ही एक पर्यावरण आणि............. आहे.

उत्तर: आवर्षण ही एक पर्यावरणातील वातावरण आणि हवामानविषयक घटकाद्वारे उद्भवणारी आपत्ती आहे.

५५) .............च्या मते, पाणी, सरोवर, भूमिगत पाणी यांची पातळी कमी होणे म्हणजे अवर्षण होय.

उत्तर : जल वैज्ञानिकांच्या मते, "पाणी, सरोवर भूमिगत पाणी यांची पातळी कमी होणे म्हणजे अवर्षण होय"

५६) अर्थशास्त्रीयदृष्ट्या दुष्काळी परिस्थिती म्हणजे......... होय.

उत्तर: अर्थशास्त्रीयदृष्ट्या दुष्काळी परिस्थिती म्हणजे अवर्षण होय.

५७) भारतात वार्षिक सरासरी पर्जन्यमान से.मी. पेक्षा कमी असणारे प्रदेश अवर्षणग्रस्त प्रदेश म्हणून ओळखले जातात.

उत्तर: भारतात वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७५ से. मी. पेक्षा कमी असणारे प्रदेश अवर्षणग्रस्त प्रदेश म्हणून ओळखले जातात.

५८) भारताच्या एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी सुमारे........... क्षेत्र अवर्षणग्रस्त आहे. ते सुमारे १.५५ दशलक्ष चौ.कि.मी. आहे.

उत्तर: भारताच्या एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी सुमारे १/३ क्षेत्र अवर्षणग्रस्त आहे. ते सुमारे १.५५ दशलक्ष चौ.कि.मी. आहे.

५९) सुमारे ६.५ कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवरील मध्ये..................... बदल झाल्याने डायनासोर कालखंडाचा अस्त झाला.

उत्तर: सुमारे ६.५ कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवरील हवामानामध्ये बदल झाल्याने डायनासोर कालखंडाचा अस्त झाला.

६०) जागतिक तापमान वृद्धीत ..........चा वाटा सर्वाधिक आहे.
उत्तर : जागतिक तापमान वृद्धीत कार्बन डायऑक्साइडचा वाटा सर्वाधिक आहे.

६१) जागतिक तापमानवृद्धीत मिथेन या वायूचा वाटा ..........टक्के आहे.
उत्तर: जागतिक तापमानवृद्धीत मिथेन या वायूचा वाटा १८ टक्के आहे.

६२) जागतिक तापमान वृद्धीत नायट्रेट ऑक्साइडचा वाटा ............टक्के आहे.
उत्तर: जागतिक तापमान वृद्धीत नायट्रेट ऑक्साइडचा वाटा ६ टक्के आहे.

६३) जागतिक तापमान वाढीमुळे सागरजल पातळीत वाढ होत आहे. सध्या सागरजलाची पातळी दरवर्षी....... ने वाढत आहे.
उत्तर: जागतिक तापमान वाढीमुळे सागरजल पातळीत वाढ होत आहे. सध्या सागरजलाची पातळी दरवर्षी ४ ते ६ सें. मी. ने वाढत आहे.

६४) जागतिक तापमान वृद्धीत तसेच हरितगृह वायूंच्या उत्सर्जन........... या देशाचा सर्वाधिक वाटा आहे.
उत्तर : जागतिक तापमान वृद्धीत तसेच हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात संयुक्त संस्थाने (U.S.) या देशाचा सर्वाधिक आहे.

६५) ...........इ.स. १९९३ मध्ये ओझोनाराचा शोध लावला.
उत्तर: चार्लस फॅब्रीने इ.स. १९९३ मध्ये ओझोनांबराचा शोध लावला.

६६) मानवाने वेगवेगळ्या कारणांनी पर्यावरणाचे केलेले दूषितीकरण म्हणजे........ होय.
उत्तर: मानवाने वेगवेगळ्या कारणांनी पर्यावरणाचे केलेले दूषितीकरण म्हणजे प्रदूषण होय.

६७) वाढती.............. ही नैसर्गिक पर्यावरणासाठी एक समस्या बनली आहे.
उत्तर: वाढती लोकसंख्या ही नैसर्गिक पर्यावरणासाठी एक समस्या बनली आहे.

६८) परंपरागत ऊर्जा साधनांच्या अतिरेकी वापरामुळे.....वाढत आहे.

उत्तर:  परंपरागत ऊर्जा साधनांच्या अतिरेकी वापरामुळे प्रदूषण वाढत आहे.

६९)  मानवाने आगीचा शोध लावला तेव्हापासून प्रदूषणास सुरुवात झाली.
उत्तर : मानवाने आगीचा शोध लावला तेव्हापासून हवा प्रदूषणास सुरुवात झाली.

७०) भारतातील हवा प्रदूषणास मुख्यतः ......जबाबदार आहेत.
उत्तर: भारतातील हवा प्रदूषणास मुख्यतः औष्णिक विद्युत केंद्रे जबाबदार आहेत.

७१)  आम्ल पर्जन्याचे पीएच मूल्य (PH Value) ......च्या जवळपास असते.
उत्तर : आम्ल पर्जन्याचे पीएच मूल्य (PH value) पाच च्या जवळपास असते.

७२)  कार्बन डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड व सल्फर ट्राय ऑक्साइड यांच्या पाण्यात विरघळण्याने ची ...........निर्मिती होते.
उत्तर: कार्बन डायऑक्साइड, नायट्रोजन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड व सल्फर ट्राय ऑक्साइड यांच्या पाण्यात विरघळण्याने आम्लाची निर्मिती होते.

७३)  भारतातील १९८४ ची .......येथील युनियन कार्बाइडची वायुगळती दुर्घटना भीषण होती.
उत्तर: भारतातील १९८४ ची भोपाळ येथील युनियन कार्बाइडची वायुगळती दुर्घटना भीषण होती.

७४)  .......प्रदूषण म्हणजे पाण्याच्या भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्मात बदल होऊन त्याचा मानवी व जलचर प्राण्यांवर विकृत परिणाम होतो.
उत्तर : पाण्याचे प्रदूषण म्हणजे पाण्याच्या भौतिक, रासायनिक व जैविक गुणधर्मात बदल होऊन त्याचा मानवी व जलचर प्राण्यांवर विकृत परिणाम होतो.

७५) तेलवाहू जहाजाच्या गळतीमुळे तसेच अशा जहाजांचा अपघात झाल्यास .........जल प्रदूषित होते.
उत्तर: तेलवाहू जहाजाच्या गळतीमुळे तसेच अशा जहाजांचा अपघात झाल्यास सागरी जल प्रदूषित होते.

७६)  मानवाने आगीचा शोध लावला तेव्हापासून ........प्रदूषणास सुरुवात झाली.
उत्तर: मानवाने आगीचा शोध लावला तेव्हापासून हवा प्रदूषणास सुरुवात झाली.
********************************************************************************